**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/३०२/२०१०/२९

तक्रार दाखल दिनांक :- २०/०८/२०१०
निकाल दिनांक :- १९/१०/२०१०

श्री भागवत साहेबराव खोजे,
एल.आय.जी.३८२,
म्हाडा कॉलनी, पारीजात नगर,
तिसगांव औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९००११०३९४८६९) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत शहर विभाग औरंगाबाद.

गैरअर्जदार

कोरम प्रदीप. अ. सगणे अध्यक्ष/सदस्यसचिव

विलासचंद्र सु. काबरा सदस्य

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/०८/२०१० रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) व नोडल अधिकारी,औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०७/०९/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्याचा ग्राहक क्रमांक ४९०११०३९४८६९ असा आहे. ग्राहकास वीज पुरवठा घेतल्या पासुन मीटर रिडींग न घेता वीज बिल देण्यात आले. ग्राहकाने मीटर रिडींग नुसार बिल देण्याबाबत व नादुरुस्त मीटर बदली करण्याबाबत संबंधीत कार्यालयात लेखी तक्रारी दाखल केलेल्या आहेत.ग्राहकाचे मीटर दिनांक २९/०९/२००९ रोजी बदली करण्यात आले परंतु मीटर बदली अहवाल संगणकात फिड न केल्यामुळे ग्राहकास चुकीची व अवास्तव रक्कमेची वीज देयके महावितरण कंपनीकडुन येणे सुरुच राहीली.ग्राहकाने मंचात तक्रार दाखल करुन त्यापुर्वी देण्यात आलेले अवाजावी देयक रद्द करुन सुधारीत वीज देयक देण्याबाबत मंचात विनंती करुन रुपये ५००/- ची नुकसान भरपाईची मागणी केली.

२) वरील तक्रारीची सुनावणी दिनांक ०७, व २१ सप्टेबर रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री आर.एच. कवाल सहाय्याक अभियंता उपविभाग १ व वीज ग्राहक उपस्थित होते. ग्राहकाने आपली तक्रार वरील प्रमाणे कथन केली. नोडल अधिकारी यांनी आपले लेखी निवेदन सादर करुन सांगीतले की, ग्राहकास मीटर रिडींग न घेता सरासरी आकारणीची विज देयक देण्यात आलेली आहेत.तसेच त्याचे मीटर दिनांक २९/०९/२००९ रोजी बदली करण्यात आले असुन संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी जुन्या मीटरची अंतीम रिडींग सादर न केल्यामुळे मीटर बदली अहवालाची नोंद संगणकात घेता आली नाही.त्यामुळे ग्राहकास चुकीची व सरासरी आकारणीची देयके प्राप्त झाली आहेत त्यांनी कनिष्ठ अभियंता यांना देण्यात आलेल्या पत्राच्या प्रति मंचात सादर केल्या तसेच रुपये २८६२६.५०/-क्रेडीट दर्शविणारा सुधारीत वीज बिल अहवाल सादर केला. नोडल अधिकारी यांनी ग्राहकाचे सी.पी.एल.तसेच मीटर बदली अहवालाची प्रत व स्थळ निरिक्षण अहवाल मंचात सादर केला. दोन्ही बाजुकडुनचे म्हणने ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकासाठी ठेवण्यात आले.

३) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागद पत्रावरुन असे दिसुन येते की,ग्राहकास वीज पुरवठा घेतल्यापासुनच चुकीची व मीटर रिडींग न घेता वीज देयक देण्यात आलेली आहेत.त्याबाबत ग्राहकाने महावितरण कंपनीकडे ब-याच तक्रार दाखल केलेल्या आहेत.परंतु कंपनीने त्यांच्या तक्रारीची दखल न घेता त्यांना चुकीची देयके सुरुच ठेवल्याचे दिसुन येते.सी.पी.एल.वरुन ग्राहकाचे मीटर क्रमांक १६९१७८२,सप्टेबर २००८( अंतीम वाचन ११५५) रोजी बदली करुन त्याठिकाणी ४७७७१२६ क्रमांकाचे मीटर लावण्यात आले. त्यानंतर वरील मीटर दिनांक २९/०९/२००९ रोजी बदली करुन त्याठिकाणी ११९४०१०७ क्रमांकाचे मीटर लावण्यात आले.कनिष्ठ अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालावरुन जुन्या मीटरचे अंतीम वाचन दिसुन येत नसल्याचे नोंद करण्यात आली आहे. ग्राहकाचे तक्रारीवरुन त्याचे नादुरुस्त झालेले मीटर दिनांक २९/०९/२००९ रोजी बदली करुन देण्यात आले परंतु मीटर बदली अहवाल संगणकात फिड न केल्यामुळे ग्राहकास चुकीची व अवास्तव रक्कमेची वीज देयके प्राप्त झाल्याचे दिसुन येते.

४) नोडल अधिकारी यांनी मंचात सादर केलेल्या सुधारीत वीज देयक प्रस्तावाचे निरिक्षण केले असता त्यांनी ग्राहकाने वीज पुरवठा घेतल्यापासुन ची सर्व वीज देयके रद्द करुन मीटर वाचणा प्रमाणे सुधारीत वीज देयक प्रस्तावीत केलेले आहे त्यानुसार ग्राहकास सप्टेबर २००७ ते जुलै २००८ या कालावधीत मीटर रिडींगप्रमाणे ११५५ युनिटची विभागणी केल्याचे दिसुन येत असुन ऑगस्ट २००८ ते सप्टेबर २००९ या कालावधीकरीता नविन मीटरच्या वापराप्रमाणे सरासरी वीज आकारणी प्रस्तावीत केलेली आहे. या प्रस्तावानुसार एकुण २८६२६.५०/- रुपयाचे क्रेडीट दाखविण्यात आले. मंचाने वरील प्रस्तावामध्ये चुकीच्या वीज देयकावर लावण्यात आलेली व्याज व दंडाची रक्कम कमी केली नसल्याचे नोडल अधिकारी यांच्या लंक्ष्यात आणुन दिले असता त्यांनी व्याज व दंडाची वजावट दाखवुन सुधारीत वीज देयक प्रस्ताव दिनांक २४/०९/२०१० रोजी मंचा सादर केला. त्या प्रस्तावामध्ये ग्राहकास एकुण ३६९०३.९४/- रुपयाचे क्रेडीट दाखविण्यात आलेले आहे. वरील प्रस्ताव योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

५) नोडल अधिकारी व वीज ग्राहक यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, ग्राहकांनी योग्य व मीटर वाचणानुसार वीज बिल मीळण्याबाबत सतत ३ वर्षापासुन लेखी पत्र लिहुन पाठपुरावा केलेला आहे परंतु संबंधित उपविभागीय कार्यालयाने कोणतेही दखल घेतली नाही व ग्राहकाने या मंचात तक्रार दाखल केल्यानंतर सुधारीत वीज देयक प्रस्ताव मंचात सादर केला. नोडल अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, कनिष्ठ अभियंता यांनी दिनांक २९०९/२००९ रोजी बदली केलेल्या मीटरचे अंतीम वाचण सादर न केल्यामुळे मीटर बदली अहवाल संगणात फिड करता आला नाही व त्यामुळे ग्राहकास ब-याच कालावधी पर्यत चुकीचे वीज देयक देण्यात आले.मीटर बदली अहवालाचे निरिक्षण केले असता बदली केलेल्या ईलेक्ट्रॉनिक्स मीटरचे डीसप्ले गेल्यामुळे मीटर वाचण घेता येत नाही असे नमुद केले आहे. अशा परीस्थीतीत आता सादर केलेल्या सुधारीत वीज बिल अहवाला नुसार यापुर्वीच ग्राहकाची तक्रार दुर करणे शक्य होते परंतु त्यांच्या तक्रारीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसुन येते त्यामुळे ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे तो नुकसान भरपाई मीळण्यास पात्र असुन नुकसान भरपाईची रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या वैयक्तीक पगारातुन कपात करण्यात यावी असे मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने, नोडल अधिकारी यांचे प्रस्तावानुसार रुपये ३६९०३.९४/- चे क्रेडीट ग्राहकास चालु वीज देयकातुन द्यावे.

२) ग्राहकास झालेल्या मानसीक त्रासापोटी रुपये ५००/- नुकसान भरपाई देण्यात यावी.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | |
|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** |